रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).

दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

रजि.ए.डी.

**नोटीस**

जा.नं.एसएसएसटी/ विद्युत / 4591 /२०२३

दिनांक :- 18 FEB 2023

प्रति,

मे. अजित ईलेक्ट्रीकल्स,

३, रमाकांत अपार्टमेन्ट,

गुलमोहोर कॉलनी,

पाईपलाईन रोड,

**नाशिक – ४२२ ००७**

**विषय :- २० वॅट एल.ई.डी. टयुबलाईट खरेदी करणेबाबत...**

संदर्भ :- ०१). संस्थानचे संकेतस्थकावर दि.१७.१२.२०२२ ते दि.३१.०१२.२०२२ पर्यंत प्रसिध्द करणेत आलेली दरपत्रक नोटीस

०२). आपले दिनांक २१/१२/२०२२ रोजीचे दरपत्रक.

०३). जा.नं.एसएसएसटी /विद्युत /४०८५ /२०२३ दि.१६.०१.२०२३ रोजीचा पुरवठा आदेश.

०४). आपला दि.२४.०१.२०२३ रोजीचा प्राप्त ई-मेल व सोबत सिस्का एलईडी लाईटस यांचे दि.२१-०१-२०२३ रोजीचे पत्र.

०५). आपला दि.२६.०१.२०२३ व दि.१४.०२.२०२३ रोजीचा इकडील कार्यालयास प्राप्त ई-मेल.

श्री साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागासाठी मंदिर परीसर, श्री साई प्रसादालय, साईबाबा हॉस्पीटल, साईनाथ रूग्णालय, व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा या ठिकाणचे दैनंदिन मेन्टेनंस करणेकामी २० वॅट LED (बॅटन) ट्यूबलाईट ,२३० व्होल्ट, कुल व्हाईट,साईज ४ फुट (१२०० एमएम) २००० नग खरेदी करणेकामी संस्थानचे संकेतस्थकावर दरपत्रक नोटीस दि.१७.१२.२०२२ ते दि.३१.०१२.२०२२ पर्यंत प्रसिध्द करुन दरपत्रके मागविणेत आलेली होती. सदर मागणीनुसार आपण संदर्भ क्र.२ अन्वये दरपत्रक सादर केले होते. आपण दिलेले निम्नत्तम दर मंजूर झालेने आपणास जा.नं.एसएसएसटी / विद्युत /४०८५ / २०२३ दिनांक १६.०१.२०२३ अन्वये २० वॅट LED (बॅटन) ट्यूबलाईट ,२३० व्होल्ट, कुल व्हाईट,साईज ४ फुट (१२०० एमएम) २००० नग पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला होता.

परंतु,आपणास सदरचा पुरवठा आदेश प्राप्त झालेनंतर आपण संदर्भ क्र.०४ अन्वये दि.२४-०१-२०२३ रोजी संस्थानला ई-मेल द्वारे पत्र पाठवून कळविले आहे की, 4 फूट लांबीचे ट्यूबलाइट्स बाजारात उपलब्ध नाहीत आणि त्यांची लांबी सहसा 4 फूटांपेक्षा कमी असते. याबाबतचे औचित्य सिस्का कंपनीनेच दि.२१०१.२०२३ रोजीचे पत्र आपण मेलसोबत पाठविले होते. सदरचे पत्रान्वये SYSKA LED LIGHT कंपनीने कळविले आहे की, **"SYSKA हा लाईटिंगमधील अग्रगण्य ब्रँड म्हणून, आमच्या कार्यसंघ गुणवत्ता आणि मूल्याच्या दृष्टीने बाजार आणि ग्राहक बेंचमार्किंगशी जुळवून घेण्यासाठी आमच्या सर्व उत्पादन श्रेणींमध्ये सुधारणा आणि श्रेणीसुधारित करण्यासाठी सतत कार्य करत आहेत.**

२/-



मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४

दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.

• Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in • Email : saibaba@sai.org.in

रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).

दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.



**LED बॅटन श्रेणी ज्यामध्ये SSK - T5-22W समाविष्ट आहे ज्यात पूर्वीची लांबी 1200mm ते SSK - SQ2001-20W लांबी 1180mm आणि SSK - SQ2001-20 - SLM लांबी 1100mm आहे. मूल्य अभियांत्रिकी करत असताना, आम्ही आमच्या अंतर्गत उत्पादन डिझाइन आणि विकास धोरणांचे पालन करून उत्पादनाची सर्व इलेक्ट्रिकल, फोटोमेट्री आणि थर्मल कामगिरी सुनिश्चित केली होती जी BIS आणि IS मानकांशी जुळवून घेतली आहेत.हे मूल्य अभियांत्रिकी करत असताना,आम्ही आमचे उत्पादन स्लिम, स्लीक आणि सुधारित परिणामकारकतेच्या दृष्टीने अधिक कार्यक्षम बनवले होते. " असे पत्रात नमूद आहे.**

आपणास देण्यात आलेल्या कार्यादेशात २० वॅट LED (बॅटन) ट्यूब लाईट ,२३० व्होल्ट, कुल व्हाईट,साईज-४ फुट ( म्हणजेच १२०० mm) असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले होते. आपण दि.२४.०१.२०२३ रोजीचे मेलसोबत सिस्का कंपनीचे दि.२१.०१.२०२३ रोजीचे पत्रात SSK - SQ2001-20W लांबी 1180mm या साईजच्या उल्लेख आहे. त्यानुसार आपणास संस्थानमार्फत दुरध्वद्वारे वेळोवेळी सांगणेत आले होते की, २० वॅट LED (बॅटन) ट्यूब लाईट ,२३० व्होल्ट, कुल व्हाईट,साईज-४ फुट ( म्हणजेच १२०० mm) ऐवजी सिस्का कंपनीचे पत्रात नमुद असलेले SSK - SQ2001-20W लांबी 1180mm या साईज ट्यूबलाईट पुरविणेस तयार असलेबाबत ई-मेलद्वारे अथवा लेखी पत्राद्वारे संस्थानला कळविणेत यावे जेणेकरुन इकडील विभागास त्याबाबत प्रशासकिय मान्यता घेणे सोईस्कर होईल व त्यानुसार आपणास कळविता येईल. परंतु आपण कंपनीशी दराबाबत चर्चा करुन आपणास मटेरीयल पुरविणेबाबत कळवितो असे दुरध्वनीद्वारे इकडील विभागास सांगितले व तदनंतर आपण उपरोक्त **संदर्भ क्र. ५ नुसार संस्थानला ई-मेलद्वारे कळविले की, मी कोटेशन मध्ये दर हे 1100mm या साईजचे भरलेले आहे. वास्तविक आपण दिनांक २१-१२-२०२२ रोजी सादर केलेल्या दरपत्रकामध्ये फक्त एलईडी ट्युब लाईट २० वॅट ( सिस्का) असेच नमुद केलेले असून दरपत्रकामध्ये साईजचा कोठेही उल्लेख केलेला नाही अथवा आढळून येत नाही.** आपण दि.२६.०१.२०२३ व दि.१४.०२.२०२३ रोजी पाठविलेल्या ई-मेद्वारे कळविले आहे की, तुम्ही संस्थानचे मागणीनुसार सदरचे मटेरियल पुरविणेस तयार नसून माझा पुरवठा आदेश रद्द करणेत यावा, अन्यथा 1100mm या साईजच्या ट्यूबलाईट स्विकाराव्यात असे कळविले आहे. परंतु सदरचे पत्रान्वये आपणास कळविणेत येते की, आपण दिलेले दर मान्य करणेत आलेले होते. परंतु आपण संस्थानला सदरचे मटेरियल पुरवठा करणेस असमर्थ दर्शविलेली आहे. त्यामुळे संस्थान प्रशासनाचे कामात व्यत्यय निर्माण झाला तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तींचा भंग होत आहे.

तरी, आपले फर्मचे नाव पुढील तीन वर्षाकरीता संस्थानचे काळे यादीत समाविष्ठ करणेत येत असून आपणास पुढील तीन वर्षाचे कालावधीत संस्थानचे कोणत्याही प्रकारच्या ई-निविदा व कोटेशन प्रक्रियेत भाग घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(राहूल जाधव)
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी



मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.
• Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in • Email : saibaba@sai.org.in